सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण मंडळ

**: परिपत्रक क्र. १८१/२०१४ :**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१४–२०१५ पासून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजने अंतर्गत खालीलप्रमाणे सुधारणा व या योजनेसंदर्भातील जे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले त्याबाबतची माहिती खाली नमूद करण्यात येत आहे.

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी विद्यार्थ्यांपैकी कमीत कमी ३० टक्के मुलींचा सहभाग व मुलींच्या उत्पन्नाची अट रद्द करुन कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत **मुलीच्या सहभागाकरीता संख्येची मर्यादा रद्द करण्यात आलेली आहे**.

२) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी **मुलींच्या उत्पन्नाची अट रद्द करण्यात आली आहे.**

३) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेतील सहभागी विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहनपर **शैक्षणिक वर्ष २०१४–१५ या एका वर्षाकरीता १०० टक्के** अनुदान देय राहील.

४) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी मुलाकरीता असणारी उत्पन्नाची अट शिथिल करुन **उत्पन्नाची मर्यादा ही रु. २ (दोन) लाखांवरुन ती रु. ५ (पाच) लाख** एवढी करण्यात आली आहे. वार्षिक उत्पन्नाचा दाखला मा. तहसिलदार यांचे स्वाक्षरीचा असावा.

५) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या रूपये २५/– प्रतितास या मानधनात वाढ करण्यात आली असून **१ सप्टेंबर, २०१४ पासून हा दर रूपये ३०/– प्रतितास** एवढा करण्यात येत आहे. मानधनाची रक्कम पूर्वीप्रमाणेच धनादेशाद्वारे विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात जमा करण्यात यावी.

६) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत उपलब्धतेनुसार काम देताना विद्यार्थ्यांची कार्यकुशलता पाहून त्यांच्यातील कौशल्ये विकसीत करण्याच्या दृष्टीने योजनेतील प्रचलित कामांबरोबर कालानुरुप कौशल्यावर आधारित कामांचा समावेश असावा. यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाची 'विविध योजना व उपक्रम – मार्गदर्शिका' या पुस्तिकेचे अवलोकन करावे.

**वरील परिपत्रकाचा आशय संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.**

**विद्यार्थी कल्याण मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ७
दिनांक : १७ सप्टेंबर २०१४
जावक क्र. :२०१४–१५/३२७

17/9
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :</u>

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.